MHJN020011472013

नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३
होशल्याबाई डोंगरे वि. निलावती डोंगरे व इतर
CNRMHJN020011472013

## निशाणी क्रमांक ६२ वरील आदेश

सदरचा अर्ज वादीतर्फे तिचे विरुध्द प्रतिवादीचा उलटतपास नाही झालेला आदेश बाजूला होऊन प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेकामी सादर केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

वादीतर्फे वकील अंबड येथील कोर्टात प्रकरण चालवण्यासाठी गेले होते. त्यांना परत येण्यास दुपार झाली. दरम्यानचे काळात प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश केला आहे. दाव्याच्या निकालासाठी प्रतिवादीचा उलटतपास होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होण्याची प्रतिज्ञापुर्वक मागणी केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादीतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. त्यानुसार सदरचा अर्ज मंजूर करण्यास आक्षेप नसल्याचे प्रतिवादीतर्फे नमूद केले आहे.

४) वादी व प्रतिवादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला . कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादीतर्फे तिचे गैरहजेरी कारणास्तव प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होऊन वादीने प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची मागणी केली आहे. वादीतर्फे सुविद्य वकील अंबड येथील न्यायालयातील प्रकरण चालवण्यासाठी गेल्यामुळे प्रतिवादीचा उलटतपास घेण्यास ते गैरहजर राहिले असे कारण अर्जात नमूद केले आहे. परंतु, वादीविरुध्द पारित झालेला आदेश तिचे गैरहजेरी कारणास्तव झालेला आहे. तसेच, वादीचे गैरहजेरीचे कारण अर्जात नमूद नाही. प्रतिवादीतर्फे सदर अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

६) दाव्याचे अभिलेखानुसार वादीविरुध्द दिनांक २१/०९/२०२२ रोजी झालेला निशाणी क्र.६१ वरील आदेशानुसार बाजूला करण्यात आला व वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात आली. त्यानंतर प्रतिवादी उलटतपासकामी हजर असूनही वादी गैरहजर राहिल्याने तिचेविरुध्द प्रतिवादीचा उलटतपास नाही असा पुन्हा आदेश करण्यात आला. त्यामुळे वादीचे वकीलांचे गैरहजेरी कारणास्वत प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश झालेला नसल्याने अर्जातील कारण योग्य व संयुक्तिक नाही. दावा जुना व कालबध्दतेतील असून प्रतिवादीचे उलटतपासकामी बऱ्याच कालावधीपासून

प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीतर्फे अर्जास आक्षेप नसणे तथ्यहिन आहे. तथापि, दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी वादीकरिता प्रतिवादीचा उलटतपास होणे आवश्यक आहे. परंतु, वादीतर्फे अर्जातील नमूद कारण योग्य व संयुक्तिक नाही. त्यासाठी सदरचा अर्ज वादीने खर्चापोटी रक्कम रुपये ३००/– (अक्षरी रक्कम रुपये तीनशे मात्र) न्यायालयात जमा करण्याचे अटीस अधिन राहून मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. याकरीता सदरचा अर्ज खर्चाचे अटीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज निशाणी क्र.६२ वादीने खर्चापोटी रक्कम रुपये ३००/– (अक्षरी रक्कम रुपये तीनशे मात्र) न्यायालयात जमा करण्याचे अटीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

२) परिणामतः वादीकरिता प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला करण्यात येत असून वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2023.04.03 16:14:40 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः ०३/०४/२०२३

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : ०३/०४/२०२३

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)